Epaper

दैनिक जन

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

सत्याचे प्राईम्स

सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

चारा छावण्या नको, थेट अनुदान द्या!

(पान २ वर)



। गुरुवार, दि. १ ऑक्टोंबर २०२६ । वर्ष १ । अंक १७१ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

Selected

'माधुरी'ला पुन्हा 'वनतारा'मध्ये पाठवा!

नवी दिल्ली : कोल्हापूर येथील नांदणी मठात परतलेल्या माधुरी हत्तीणीचे पुनर्वसनाच्या दृष्टीने जामनगरमधील वनतारात पुन्हा स्थलांतर करण्यासाठी तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी 'पेटा इंडिया'ने सर्वोच्च न्यायालयाला केली आहे. माधुरी हत्तीण ११ ते १२ सप्टेंबर रोजी कोल्हापूर येथे परतली, तेव्हा तिला मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतषबाजी, कर्णकर्कश घोषणा, ढोलताशांचा आवाजाला सामोरे जावे लागले. आता ती साखळदंडात जखडलेल्या एकाकी कैद्याप्रमाणे जीवन जगते आहे, असा आरोप 'पेटा इंडिया'ने केला आहे. तत्पूर्वी ती वनतारामध्ये आपल्या मैत्रीण शांतीबरोबर मुक्त विहाराचा आनंद घेत होती. मात्र आता एका शेडमध्ये ती एकाकी आहे. तिच्या दीर्घकालीन स्वास्थ्यासाठी हे ठिकाण अयोग्य असल्याचा निष्कर्ष तज्ज्ञांनी यापूर्वीच दिला आहे, असेही संस्थेच्या धोरण विभागाच्या उपाध्यक्ष खुशबू गुप्ता यांनी म्हटले आहे.

अर्ज-६ मधील वादग्रस्त घोषणापत्र हटवले; एसआयआर पूर्ण झालेल्या राज्यांतील नव्या मतदारांना दिलासा

निवडणूक आयोगाची अखेर माघार!

एसआयआरवरील अतिरिक्त घोषणापत्र मागे, विरोधकांचा २ ऑक्टोबरपासून 'लोकशाही वाचवा' एल्गार

जन सम्राट टाईम्स

मुंबई । मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पडताळणी प्रक्रियेवरून (एसआयआर) सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदार नोंदणी अर्ज-६ मधील अतिरिक्त घोषणापत्र हटविण्याचा निर्णय घेतला आहे. एसआयआर प्रक्रिया पूर्ण झालेल्या राज्यांमध्ये ऑनलाइन अर्ज-६ भरताना यापुढे एसआयआरशी संबंधित अतिरिक्त घोषणा करावी लागणार नाही.

त्यामुळे नव्याने मतदार नोंदणी करू इच्छिणाऱ्या नागरिकांना मतदार नोंदणी नियम, १९६० अंतर्गत निर्धारित वैधानिक अर्ज-६ भरता येणार आहे.यापूर्वी अर्जदाराला स्वतःचा, आई-वडिलांचा किंवा आजी-आजोबांचा यापूर्वीच्या एसआयआरमध्ये मतदारयादीत समावेश होता की नाही, यासंबंधी अतिरिक्त घोषणापत्र द्यावे लागत होते. मात्र, ही अट एसआयआर प्रक्रियेपुरती मर्यादित असल्याचे स्पष्ट करत आयोगाने एसआयआर पूर्ण झालेल्या राज्यांमध्ये ईसीआयनेट ॲप, पोर्टल तसेच संबंधित मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावरून



हे अतिरिक्त घोषणापत्र हटविले आहे. एसआयआर प्रक्रिया अद्याप सुरू असलेल्या राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये मात्र हे घोषणापत्र उपलब्ध राहणार आहे. या निर्णयामुळे नव्या मतदारांच्या नोंदणी प्रक्रियेतील अतिरिक्त कागदोपत्री अडथळे कमी होण्याची शक्यता आहे. २६ सप्टेंबरच्या बैठकीनंतर निर्णय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयुक्त सुखबीरसिंग संधू व विवेक जोशी यांच्या पूर्णपीठ बैठकीनंतर आयोगाने एसआयआर प्रक्रियेशी संबंधित काही निर्णय घेतले. मतदार पडताळणी अधिक नागरिकाभिमुख करण्यावर आयोगाने भर दिला आहे. एसआयआरमधील त्रुटी किंवा विसंगतींबाबत नोटीस मिळालेल्या नागरिकांना प्रत्येक वेळी कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची आवश्यकता नसून, आवश्यक कागदपत्रे गोळा करण्यासाठी बीएलओंना नागरिकांच्या घरी पाठविण्याची व्यवस्था करण्याचे आयोगाने जाहीर केले आहे.वृद्ध, दिव्यांग, आजारी तसेच इतर असुरक्षित

आयोगाविरोधात देशव्यापी आंदोलनाची घोषणा

विरोधकांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासह एसआयआर प्रक्रियेबाबत बदल आणि व्यापक निवडणूक सुधारणांची मागणी केली आहे. मतदारयादीतील कथित फेरफारांबाबत विरोधकांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत; मात्र निवडणूक आयोगाने आपली प्रक्रिया कायदेशीर असल्याचे सांगत आरोपांना नकार दिला आहे.

घटकांतील मतदारांना मदत करण्यासाठी विशेष मदत कक्ष उभारण्यावरही भर देण्यात आला आहे. मतदारयादीतील बदलांची प्रक्रिया अधिक सुरक्षित व पारदर्शक करण्यासाठी आयोगाकडून सॉफ्टवेअर प्रक्रियेचाही आढावा घेतला जात आहे. दरम्यान, एसआयआर आणि मतदारयादीतील बदलांवरून विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगाविरोधात देशव्यापी आंदोलनाची घोषणा केली आहे. 'इंडिया' आघाडीने २ ते ८ ऑक्टोबरदरम्यान जिल्हास्तरावर 'लोकशाही वाचवा' मोर्चे आणि निदर्शने करण्याचा निर्णय घेतला असून, ६ ऑक्टोबरला विरोधी खासदार निवडणूक आयोगाकडे मोर्चा काढणार आहेत.

तरुणांच्या संशोधनातून महाराष्ट्र जगाचे 'इनोव्हेशन हब' होईल; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार, संशोधन आणि तरुणांच्या नवकल्पनांच्या बळावर राज्याला भविष्यात जगाचे 'इनोव्हेशन हब' बनविण्याचे सामर्थ्य आहे. देशातील एकूण स्टार्टअपपैकी सुमारे १८ टक्के स्टार्टअप राज्यात सुरु होत आहेत. राज्यात ३० हजारांहून अधिक स्टार्टअप आहेत. या परिसंस्थांना संशोधन, उद्योग आणि बाजारपेठेची जोड देऊन नवकल्पनांचे प्रत्यक्ष परिणाम दिसतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. एनसीपीएच्या जमशेद भाभा सभागृहात गेट्स फाउंडेशन आणि समग्र संस्थेच्या समन्वयाने आयोजित 'द गव्हर्नन्स चॅलेंज'च्या चौथ्या आवृत्तीतील विजेत्यांना फडणवीस यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, 'मित्रा'चे सदस्य दीपक करंजीकर उपस्थित होते. राज्याला २०३५ पर्यंत संशोधनाच्या दृष्टीने सक्षम करण्यासाठी नवकल्पनांचा वापर हा यंदाच्या स्पर्धेचा विषय होता. ही केवळ स्पर्धा नसून प्रशासनाच्या भविष्यातील रचनेला आकार देणाऱ्या प्रतिभा आणि कल्पना शोधण्याचा उपक्रम आहे, असे फडणवीस यांनी सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा विश्लेषण, डिजिटल प्रशासन, शहरीकरण, कृषी, आरोग्य, शिक्षण, हवामान बदल आणि नवोन्मेष या क्षेत्रांत तरुणांचा दृष्टिकोन प्रशासनात आणण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. राज्यातील नागपूर, नाशिक, कोल्हापूर, नांदेड, अमरावतीसह प्रत्येक भागातील युवा संशोधकांना मार्गदर्शन, तंत्रज्ञान, इन्क्युबेशन आणि बाजारपेठ उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे. हॅकेथॉन किंवा स्पर्धा केवळ प्रमाणपत्र देऊन संपता कामा नये, त्यातून पुढे आलेल्या कल्पनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली पाहिजे, असेही मुख्यमंत्र्यांनी



स्पष्ट केले. राज्यात ३०० एकर क्षेत्रावर कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित 'इनोव्हेशन सिटी' उभारण्याचे नियोजन आहे. राज्यातील कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणांतर्गत दोन लाख युवक व व्यावसायिकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. एआय इन्क्युबेटर्स स्थापन करण्याची तयारी आहे. शासकीय डेटाचाही युवा नवोन्मेषकांना संशोधनासाठी उपयोग करून देण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.स्पर्धेच्या अंतिम फेरीत सहा संघांनी आरोग्य, कृषी, शिक्षण, वित्त, प्रशासनातील नवोन्मेष आणि शहरी विकास या विषयांवर सादरीकरण केले. मास्टर्स युनियन स्कूल ऑफ बिझनेसच्या अंकिता शिर्के, सिद्धार्थ राजपाल आणि गुरुप्रसाद शेट्टी यांच्या संघाने शहरी विकासावरील नवकल्पनेसाठी पाच लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक मिळविले. शिक्षण क्षेत्रातील सादरीकरणासाठी आयआयएम मुंबईच्या शुभम पाटील, वरुण दामले व संहिता म्हात्रे यांना एक लाख रुपयांचे तृतीय पारितोषिक मिळाले. द्वितीय पारितोषिक तीन लाख रुपये शिक्षण विषयावरील सादरीकरण करणाऱ्या संघाला देण्यात आले. नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार, संशोधन आणि तरुणांच्या नवकल्पनांच्या बळावर राज्याला भविष्यात जगाचे 'इनोव्हेशन हब' बनविण्याचे सामर्थ्य आहे. देशातील एकूण स्टार्टअपपैकी सुमारे १८ टक्के स्टार्टअप राज्यात सुरु होत आहेत. राज्यात ३० हजारांहून अधिक स्टार्टअप आहेत. या परिसंस्थांना संशोधन, उद्योग आणि बाजारपेठेची जोड देऊन नवकल्पनांचे प्रत्यक्ष परिणाम दिसतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. एनसीपीएच्या जमशेद भाभा सभागृहात गेट्स फाउंडेशन आणि समग्र संस्थेच्या समन्वयाने आयोजित 'द गव्हर्नन्स चॅलेंज'च्या चौथ्या आवृत्तीतील विजेत्यांना फडणवीस यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, 'मित्रा'चे सदस्य दीपक करंजीकर उपस्थित होते. राज्याला २०३५ पर्यंत संशोधनाच्या दृष्टीने सक्षम करण्यासाठी नवकल्पनांचा वापर हा यंदाच्या स्पर्धेचा विषय होता. ही केवळ स्पर्धा नसून प्रशासनाच्या भविष्यातील रचनेला आकार देणाऱ्या प्रतिभा आणि कल्पना शोधण्याचा उपक्रम आहे.

२ ऑक्टोबरचं MPSC विद्यार्थ्यांचं आंदोलन स्थगित

जन सम्राट टाईम्स

नाशिक । प्रतिनिधी: गेल्या काही दिवसांपासून एमपीएससीच्या परीक्षांच्या विविध मुद्यांवरून विद्यार्थी राज्यभर आंदोलन करत आहेत. आता पुन्हा एकदा विद्यार्थ्यांनी २ ऑक्टोबर रोजी आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. मात्र, त्याआधी म्हणजे आज (३० सप्टेंबर) एमपीएससी विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची महत्वाची बैठक पार पडली आहे. या बैठकीत विद्यार्थ्यांच्या सर्व समस्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाणून घेतल्या आणि त्यावर सविस्तर चर्चा केली. विद्यार्थ्यांच्या बहुतांश मागण्या मान्य करण्यात आल्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थ्यांना दिलं आहे. एमपीएससी परीक्षा ऑफलाईनच होईल आणि आजवरचे सर्व रेकॉर्ड तुटतील एवढ्या जागा भरण्यात येतील, असं ठोस आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे. त्यानंतर अखेर पुण्यात २ ऑक्टोबर रोजी होणारं विद्यार्थ्यांचं आंदोलन स्थगित करण्यात आल्याची माहिती सांगण्यात आली आहे. या संदर्भातील माहिती सीएमओ कार्यालयाने एक्सवर पोस्ट शेअर करत दिली आहे. मपीएससी अध्यक्ष हे संवैधानिक पद आहे. त्यांना हटवण्याचा



अधिकार राज्य सरकार, राज्यपाल यांना नाही. राष्ट्रपतींना सुप्रीम कोर्टाच्या सल्ल्याने तो अधिकार आहे. एमपीएससीचे पूर्व आणि विद्यमान अध्यक्ष तसेच सदस्य यांच्याबाबत संविधानाच्या कलम ३१७ प्रमाणे हटवण्याची कारवाई व्हावी, अशी विद्यार्थ्यांची मागणी होती. त्यानुषंगाने ३ महिन्यांत न्यायालयीन चौकशी करून त्या निष्कर्षाच्या आधारावर पुढची कारवाई करण्यात येईल.आजवरचे सर्व रेकॉर्ड तुटतील, इतक्या जागा भरण्यात येतील. राज्य सरकारमध्ये ३० ते ४० हजार पदोन्नती झालेल्या नव्हत्या. भरती नियमात १९६० पासून नवीन सुधारणा झालेल्या नव्हत्या. त्यामुळे विभागात साधारणतः ३०-४० टक्के जागा भरण्याची परवानगी दिली जायची. आता ६० टक्के विभागांचे ते नियम तयार झाले आहेत. उर्वरित विभागांचे सुद्धा होत आहेत. त्यामुळे पूर्ण जागा भरण्याची तयारी सुरू आहे. ३ जानेवारीच्या गट 'क' च्या परीक्षेच्या अनुषंगाने जागावाढीची विद्यार्थ्यांची मागणी मान्य करण्यात आली. गट क मध्ये ही वाढ विक्रमी असेल. सिंगल कार्डवर सर्व परीक्षा देता याव्या, अशी यंत्रणा उभारण्यात येणार आहे. माफक दरात हे कार्ड उपलब्ध करुन देण्यात येईल. शिवाय सर्व कागदपत्रे वारंवार द्यावी लागणार नाही, अशी व्यवस्था विकसित करण्यात येईल.गेल्या काही दिवसांपासून एमपीएससीच्या परीक्षांच्या विविध मुद्यांवरून विद्यार्थी राज्यभर आंदोलन करत आहेत.

सोमालियात भारतीयासह पाच खलाशांची हत्या!

मुंबई : सोमालियामध्ये समुद्री चाच्यांनी ताब्यात घेतलेल्या एका इंधन टँकरवरील पाच कर्मचाऱ्यांची हत्या केली. यात एक जण जखमी झाला आहे. मृतांमध्ये एका भारतीय खलाशाचा समावेश आहे. दरम्यान, आफ्रिकेच्या सुरक्षा दलांनी या जहाजाचा ताबा पुन्हा मिळवला आहे. केनियातील भारतीय उच्चायुक्तालयाने बुधवारी एका समाजमाध्यम पोस्ट प्रसिद्ध करत 'एमटी ऑनर'वरील भारतीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूबद्दल खेद व्यक्त केला. 'पुंटलँड मेरीटाइम पोलीस फोर्स'ने राबवलेल्या मोहिमेदरम्यान या कर्मचाऱ्यांची समुद्री चाच्यांकडून हत्या करण्यात आली.

आईने दागिने विकले, मुलाने देशासाठी जिंकली दोन सुवर्णपदके

साताऱ्याच्या साहिलची प्रेरणादायी कहाणी

जन सम्राट टाईम्स

मुंबई | प्रतिनिधी: घरची बेताची आर्थिक स्थिती, वडलांची नोकरी गेलेली, बहिणीची जबाबदारी अशा पार्श्वभूमीवर त्याने तिरंदाजीचे स्वप्न उराशी बाळगले. अखंड सराव, मेहनत घेण्यास सुरुवात केली. या पार्श्वभूमीवर त्याच्या या जिद्दीपुढे आर्थिक पाठबळाचे संकट उभे ठाकले. अशावेळी मुलाचे स्वप्न साकार करण्यासाठी अखेर त्याच्या आईने स्वत:चे दागिने विकले आणि तिरंदाजीसाठी आवश्यक सराव-साहित्य खरेदी केले. या साऱ्या संघर्षातून उभ्या राहिलेल्या या 'अर्जुना'ने जपानमध्ये सुरू असलेल्या २०२६ आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला एक नाही तर तब्बल दोन सुवर्णपदके मिळवून दिली आहेत. ही गौरवगाथा आहे सातारा जिल्ह्यातील करंडी गावातील साहिल जाधव याची. त्याच्या या यशाचे आज देशभर कौतुक होत आहे. साहिल हा सातारा जिल्ह्यातील करंडी नावाच्या छोट्याशा गावातील खेळाडू. त्याला सुरुवातीपासूनच तिरंदाजी खेळाची आवड होती. शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात त्याच्या या खेळाला उत्तेजन मिळाले. त्याचे माध्यमिक शिक्षण साताऱ्यातील अनंत इंग्लिश स्कूलमध्ये झाले. तर साताऱ्यातीलच वाय. सी. कॉलेजमधून एम.एस्सी. पूर्ण करत त्याने महाविद्यालयीन शिक्षण घेतले. शिक्षणाच्या या टप्प्यावरच साहिल तिरंदाजीकडे वळला. मात्र घरच्या सामान्य परिस्थितीमुळे या खेळात पुढे प्रवास करणे त्याच्यासाठी आव्हानात्मक ठरले होते. एका शेतकरी कुटुंबातून आलेल्या साहिलचे वडील राजेश जाधव हे एका खासगी कंपनीत नोकरी करत होते. मात्र साहिलचे शिक्षण सुरू



असतानाच त्यांची ही नोकरी गेली. आई सीमा जाधव शिक्षिका म्हणून नोकरी करतात. त्यांच्या उत्पन्नावरच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू आहे. साहिलसोबतच एक बहिण सानिका हिचेही शिक्षण सुरू. अशा परिस्थितीत तिरंदाजीसारख्या महागड्या खेळाचे स्वप्न पाहणेही साहिलसाठी अवघड होते. या खेळासाठी लागणारा सराव, मार्गदर्शन, महागडी साधने यासाठी खूप मोठा खर्च करावा लागणार होता. मात्र मुलाची आवड आणि जिद्द पाहून या कुटुंबाने आर्थिक चटके सहन करत साहिलच्या या खेळाला पाठिंबा दिला. प्रसंगी त्याच्या आईने स्वत:चे दागिने विकले मात्र त्याच्या या खेळाचा प्रवास निरंतर सुरू राहील याची काळजी घेतली.कुटुंबाच्या या पाठिंब्याच्या जोरावर साहिलने देखील अपार मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर तिरंदाजीतील हा प्रवास सतत यशाची कमान उंचावत सुरू केला. २०१६ मध्ये साहिलने व्यावसायिक स्पर्धेसाठी सराव सुरू केला. 'दृष्टी आर्चरी अकादमी'तून त्याने प्रशिक्षणाला सुरुवात केली. मात्र, त्याचा हा प्रवास मुळीच सोपा नव्हता. पहिले राष्ट्रीय पदक मिळवण्यासाठी त्याला तब्बल सात वर्षे वाट पाहावी लागली. अनेकदा अगदी थोड्या फरकाने त्याचे हे पदक हुकले, पण त्याने हार मानली नाही. अखेर २०२४ मध्ये वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धेत त्याने पहिले राष्ट्रीय सुवर्णपदक पटकावले.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

खरातच्या वकिलांकडून पेनड्राईव्हची मागणी; जामीन अर्जावर कोर्टात जोरदार युक्तिवाद

सरकारी पक्षाचे उज्ज्वल निकम व बचाव पक्षाचे राहुल कासलीवाल यांच्यात कायदेशीर मुद्द्यांवर खडाजंगी

जन सम्राट टाईम्स

नाशिक। प्रतिनिधी: भोंदूगिरी, अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याचे उल्लंघन आणि लैंगिक अत्याचारासंबंधी गुन्ह्यांमध्ये अटक करण्यात आलेल्या अशोक खरात यांच्या जामीन अर्जावर बुधवारी नाशिक सत्र न्यायालयात सुनावणी पार पडली. सरकारी पक्षातर्फे ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांनी तर बचाव पक्षातर्फे ॲड. राहुल कासलीवाल यांनी युक्तिवाद केला.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकल्यानंतर न्यायालयाने जामीन अर्जावरील निर्णय ३ ऑक्टोबरपर्यंत राखून ठेवला असून नियमित सुनावणी ८ ऑक्टोबरला होणार आहे. सरकारी पक्षातर्फे युक्तिवाद करताना उज्ज्वल निकम यांनी फिर्यादींच्या तक्रारी, एफआयआरमधील उल्लेख आणि तपासातील बाबींचा आधार घेत आरोपीने स्वतःमध्ये दैवी शक्ती असल्याचा दावा केल्याचा मुद्दा मांडला. फिर्यादींना दगड देऊन त्यामध्ये विशेष शक्ती असल्याचे सांगणे, स्पर्शाने कल्याण होईल असे सांगणे, तसेच अशा कृतींमुळे अंधश्रद्धेला प्रोत्साहन मिळाल्याचा दावा त्यांनी न्यायालयासमोर मांडला. यावेळी निकम यांनी एफआयआरमधील काही उल्लेख वाचून दाखवले. आरोपीचा प्रभाव मोठ्या व्यक्तींवर आणि पोलिसांवर असल्याची भीती काही फिर्यादींनी व्यक्त केल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच तपासात समोर आलेल्या इतर प्रकरणांचीही दखल घेण्याची मागणी सरकारी पक्षाने केली. दुसरीकडे बचाव पक्षाचे वकील राहुल कासलीवाल यांनी



आरोपीविरुद्ध लावण्यात आलेल्या काही कलमांवर आक्षेप घेतला. संबंधित प्रकरणातील शिक्षेची मर्यादा सात वर्षांपर्यंत असल्याने जामीन देण्यास कायदेशीर अडचण नसल्याचा युक्तिवाद त्यांनी केला. तसेच अंधश्रद्धा निर्मूलन कायद्यांतर्गत दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांबाबतही संशय व्यक्त करत, संबंधित कायद्यातील परिशिष्टात नमूद बाबी आणि फिर्यादीतील आरोप यांच्यात तफावत असल्याचे त्यांनी सांगितले. व्हिडीओ पुरावे बंद लिफाफ्यात सादर करण्याबाबत सरकारी पक्षाला निर्देश दिल्याचे सांगण्यात आले. लैंगिक अत्याचाराशी संबंधित प्रकरणांमध्ये पीडितांच्या गोपनीयतेचे संरक्षण करणे आवश्यक असल्याने पुरावे हाताळताना विशेष खबरदारी घेण्याची भूमिका बचाव पक्षानेही स्पष्ट केली. अंधश्रद्धा कायद्यावरही युक्तिवाद बचाव पक्षाने धार्मिक परंपरा, ज्योतिष, अंकशास्त्र किंवा स्टोन थेरपी यांसारख्या बाबींचा उल्लेख करत, त्या सर्व गोष्टींना जादूटोणा म्हणता येणार नाही, असा मुद्दा मांडला. सरकारी पक्षाने मात्र आरोपीच्या कथित वर्तनाचा अंधश्रद्धेशी संबंध असल्याचा दावा कायम ठेवला. दोन्ही बाजूंचा सविस्तर युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने जामीन अर्जावरील निर्णय ३ ऑक्टोबरला जाहीर केला जाईल, असे स्पष्ट केले. त्यामुळे आता या प्रकरणातील पुढील घडामोडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भोंदूगिरी, अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याचे उल्लंघन आणि लैंगिक अत्याचारासंबंधी गुन्ह्यांमध्ये अटक करण्यात आलेल्या अशोक खरात यांच्या जामीन अर्जावर बुधवारी नाशिक सत्र न्यायालयात सुनावणी पार पडली. सरकारी पक्षातर्फे ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांनी तर बचाव पक्षातर्फे ॲड. राहुल कासलीवाल यांनी युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकल्यानंतर न्यायालयाने जामीन अर्जावरील निर्णय ३ ऑक्टोबरपर्यंत राखून ठेवला असून नियमित सुनावणी ८ ऑक्टोबरला होणार आहे.

चारा छावण्या नको, थेट अनुदान द्या!

भ्रष्टाचार, गैरसोय टाळण्यासाठी विविध संघटना, मंत्र्यांची मागणी

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी : अपुऱ्या पावसामुळे राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळी स्थितीमुळे राज्य सरकारने ३०८ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. या दुष्काळी तालुक्यांपैकी मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्राच्या पूर्व भागात चारा टंचाई तीव्र होण्याची शक्यता आहे. मात्र, या भागात जनावरांसाठी चारा छावण्या न उभारता, थेट शेतकरी, पशुपालकांना अनुदान द्या, अशी मागणी होऊ लागली आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे – पाटील यांच्या नंतर कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनीही थेट अनुदान देण्याची मागणी केली आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या २२ सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीत २६५ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केले होते. याच बैठकीत यंदा जनावरांसाठी चारा – छावण्या न सुरू करता, थेट शेतकऱ्यांना अनुदान द्या, अशी मागणी राधाकृष्ण विखे – पाटील यांनी केली होती. मागील अनुभव पाहता छावण्यांमध्ये होणारा गैरव्यवहार, जनावरांची आबळ, जास्त जनावरे दाखवून अनुदान लाटण्याचे प्रकार यंदा पुन्हा होऊ नयेत, यासाठी थेट शेतकरी आणि पशुपालकांना अनुदान द्यावे, अशी भूमिका घेतली होती.

कृषिमंत्री भरणे यांच्याकडेही चारा छावणी नको, थेट अनुदान द्यावे, अशी मागणीचे अनेक निवेदने आली आहेत. त्याची दखल घेत मंत्रिमंडळाच्या दुष्काळ निवारण उप समितीच्या बैठकीत या विषयावर चर्चा केली जाईल. सरकारकडे सर्व शेतकऱ्यांची,



पशूधनाची माहिती उपलब्ध आहे. शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर थेट अनुदान पाठविणे सरकार आणि शेतकऱ्यांच्या दृष्टीने सोयीचे आहे. चारा छावण्यांमध्ये होणाऱ्या भष्टाचार, चारा छावण्या देण्यासाठी राजकीय कार्यकर्त्यांचा आग्रह आणि पुन्हा अनुदान रखडले म्हणून निर्माण होणारा रोष टाळण्यासाठी छावण्यांऐवजी थेट अनुदान सरकारच्याही सोयीचे आहे.

मंत्रिमंडळ उपसमितीत या विषयावर चर्चा होईल, अंतिम निर्णय मुख्यमंत्री घेतील, असे भरणे यांनी म्हटले आहे. शेतकऱ्यांना थेट अनुदान देण्याची मागणी होत असली तरीही शेतकऱ्यांना चारा उपलब्ध कुठून होणार, हा प्रश्न आहे. त्यामुळे थेट अनुदान न देता गावनिहाय चारा डेपो सुरू करण्याचा एक पर्याय आहे. चारा डेपोतून शेतकऱ्यांना चारा पुरविला जाईल. छावण्या सुरू करण्याचा पर्याय शेवटचा आहे. सध्या तरी नदीकाठावर, पाणी उपलब्ध असलेल्या ठिकाण चारा पिकांची लागवड करून मोठ्या प्रमाणावर चारा उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी पशुसंवर्धन, कृषी आणि आपत्ती व पुनर्वसन विभाग समन्वयाने काम करीत आहेत.

पुढील बैठकीत या बाबत निर्णय घेतला जाईल, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव यांनी दिली.चारा छावण्या सुरू करताना स्थानिक सेवा सोसायट्यांची, सहकारी संस्थांची मदत घ्यावी लागते. शेतकऱ्यांना जनावरांसाठी छावण्यांमध्ये स्वतः निवारा उभा करावा लागतो. एका व्यक्तीला कायम छावण्यांवर थांबून रहावे लागते. चारा छावण्या जुनी संकल्पना आहे, आज सरकारकडे असलेल्या माहितीच्या आधारे थेट चारा अनुदान देणे शक्य आहे. त्यामुळे मंत्रिमंडळाची उपसमितीही चारा छावण्यांऐवजी थेट अनुदान देण्याची शिफारस मुख्यमंत्र्यांकडे करणार आहे, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. अपुऱ्या पावसामुळे राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळी स्थितीमुळे राज्य सरकारने ३०८ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. या दुष्काळी तालुक्यांपैकी मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्राच्या पूर्व भागात चारा टंचाई तीव्र होण्याची शक्यता आहे. मात्र, या भागात जनावरांसाठी चारा छावण्या न उभारता, थेट शेतकरी, पशुपालकांना अनुदान द्या, अशी मागणी होऊ लागली आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे – पाटील यांच्या नंतर कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनीही थेट अनुदान देण्याची मागणी केली आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या २२ सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीत २६५ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केले होते. याच बैठकीत यंदा जनावरांसाठी चारा – छावण्या न सुरू करता, थेट शेतकऱ्यांना अनुदान द्या, अशी मागणी राधाकृष्ण विखे – पाटील यांनी केली होती. मागील अनुभव पाहता छावण्यांमध्ये होणारा गैरव्यवहार, जनावरांची आबळ, जास्त जनावरे दाखवून अनुदान लाटण्याचे प्रकार यंदा पुन्हा होऊ नयेत, यासाठी थेट शेतकरी आणि पशुपालकांना अनुदान द्यावे, अशी भूमिका घेतली होती.कृषिमंत्री भरणे यांच्याकडेही चारा छावणी नको, थेट अनुदान द्यावे, अशी मागणीचे अनेक निवेदने आली आहेत.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

नवरात्रीत 'जागर आरोग्याचा'



जन सम्राट टाईम्स

मुंबई | प्रतिनिधी : वाढता स्क्रीन टाइम, अपुरी झोप, चुकीच्या आहाराच्या सवयी, व्यायामाचा अभाव आणि मानसिक ताण यामुळे तरुणांच्या आरोग्याचे प्रश्न वाढत आहेत. नवरात्रीच्या नऊ दिवसांत राज्यातील महाविद्यालयीन तरुणाईमध्ये आरोग्याचा जागर केला जाणार आहे. तरुण वयापासूनच आरोग्यदायी जीवनशैलीची सवय लागावी, यासाठी राज्यात प्रथमच 'मुख्यमंत्री आरोग्य संवाद' हा नऊ दिवसांचा विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. राज्यातील विद्यापीठे आणि वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक, विभागप्रमुख आणि वैद्यकीय तज्ञ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधणार आहेत. वैद्यकीय उपचारांपेक्षा आजार टाळण्याच्या दृष्टिकोनातून तरुणाईमध्ये आरोग्यविषयक जागृती निर्माण करण्यावर या उपक्रमाचा भर राहणार आहे. वैद्यकीय, कृषी, अभियांत्रिकी, विज्ञान, वाणिज्य, कला तसेच अन्य विद्याशाखांतील विद्यार्थी या संवादात सहभागी होतील. प्रत्येक जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालयांतील तज्ञ विद्यार्थ्यांना बदलती जीवनशैली आणि त्याचा आरोग्यावर होणारा परिणाम याबाबत मार्गदर्शन करतील. योग्य आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, मानसिक आरोग्याची काळजी, व्यसनांपासून दूर राहणे आणि वेळेवर आरोग्य तपासणी यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले जाणार आहे.मोबाईल आणि समाजमाध्यमामुळे वाढलेला स्क्रीन टाइम, बदललेल्या आहाराच्या सवयी,शारीरिक तंदुरुस्तीचा अभाव आणि मानसिक ताण हे संवादातील प्रमुख विषय असतील. तरुणांमध्ये आरोग्यविषयक समस्या निर्माण होण्यापूर्वीच त्यांना प्रतिबंधात्मक उपायांची माहिती देण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे. विद्यार्थ्यांना तज्ञांशी थेट संवाद साधता येणार आहे.आरोग्याशी संबंधित प्रश्नही मोकळेपणाने मांडता येतील. या संवादातून मिळालेली माहिती विद्यार्थ्यांनी स्वतःपुरती मर्यादित न ठेवता कुटुंब, मित्र आणि समाजापर्यंत पोहोचवावी,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आरोग्यदूताची भूमिका बजावण्याची संधीही मिळणार आहे. वाढता स्क्रीन टाइम, अपुरी झोप, चुकीच्या आहाराच्या सवयी, व्यायामाचा अभाव आणि मानसिक ताण यामुळे तरुणांच्या आरोग्याचे प्रश्न वाढत आहेत. नवरात्रीच्या नऊ दिवसांत राज्यातील महाविद्यालयीन तरुणाईमध्ये आरोग्याचा जागर केला जाणार आहे. तरुण वयापासूनच आरोग्यदायी जीवनशैलीची सवय लागावी, यासाठी राज्यात प्रथमच 'मुख्यमंत्री आरोग्य संवाद' हा नऊ दिवसांचा विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. राज्यातील विद्यापीठे आणि वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक, विभागप्रमुख आणि वैद्यकीय तज्ञ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधणार आहेत.

महाकवी वामनदादा कर्डक यांची १०४ वी जयंती उत्साहात

'जागर महामानवांचा' उपक्रमांतर्गत कवी संमेलन

जन सम्राट टाईम्स

पुणे| प्रतिनिधी: महाकवी वामनदादा कर्डक यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त 'जागर महामानवांचा' पश्चिम हवेली यांच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कवी संमेलन, भीमगीतांचा जलसा तसेच सामाजिक व सांस्कृतिक चळवळीसाठी योगदान देणाऱ्या कलाकारांचा सन्मान अशा विविध उपक्रमांनी जयंती सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला चळवळीचे 'चालते-बोलते विद्यापीठ' म्हणून परिचित असलेले वसंतदादा साळवे, कला दिग्दर्शक संतोष संखद, तसेच कवी, लेखक व दिग्दर्शक हृदयमानव अशोक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी बोलताना वसंतदादा साळवे यांनी महाकवी वामनदादा कर्डक यांच्या साहित्यिक आणि सामाजिक योगदानाचा गौरव केला. "वामनदादांनी आपल्या गीतांच्या माध्यमातून कायमच चळवळीतील प्रश्न मांडले. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य आंबेडकरी



चळवळीसाठी समर्पित केले," असे त्यांनी सांगितले. कला दिग्दर्शक संतोष संखद म्हणाले, "वामनदादा कर्डक हे प्रत्येक पिढीसाठी कायम प्रेरणादायी आणि आदर्श व्यक्तिमत्त्व राहिले आहेत. त्यांच्या साहित्याचा आणि गीतांचा प्रभाव आजही समाजमनावर कायम आहे." तर कवी, लेखक व दिग्दर्शक हृदयमानव अशोक यांनी वामनदादांच्या प्रतिभेचे महत्त्व अधोरेखित केले. "वामनदादांनी त्या काळात लिहिलेली अनेक गीते आजही मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय होत आहेत. काळ बदलला, पिढ्या बदलल्या, तरी त्यांच्या गीतांतील विचार आणि प्रतिभेची ताकद अबाधित आहे," असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमादरम्यान आयोजित करण्यात आलेल्या कवी संमेलनात विविध कवींनी विद्रोही व सामाजिक आशयाच्या कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. गायक मिलिंद सावळे यांनी 'सावली गोड तुझी' हे गीत सादर करून महाकवी वामनदादा कर्डक यांना संगीतमय अभिवादन केले. यानंतर झालेल्या भीमगीतांच्या जलशात विविध नामवंत गायकांनी चळवळीची गीते सादर केली. गीत-संगीताच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचा विचार उपस्थितांपर्यंत पोहोचविण्यात आला. तसेच चळवळीसाठी विविध माध्यमांतून योगदान देणाऱ्या कलाकारांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्र गुणगौरव पुरस्काराने इंजि. सविता केदारे सन्मानित!

सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल

जन सम्राट टाईम्स

पुणे । प्रतिनिधी: बी द चेंज फाउंडेशनच्या वतीने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल मिस इंजि. सविता सावित्रीबाई निंबाजी केदारे यांना प्रतिष्ठेचा 'महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. इंजिनीयर, लेखिका आणि कवयित्री म्हणून स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करत असतानाच सविता केदारे यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातही सातत्यपूर्ण योगदान दिले आहे. कौटुंबिक जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळत त्यांनी सामाजिक कार्यासाठी वेळ देत विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक तसेच कौटुंबिक क्षेत्रातील उल्लेखनीय कर्तृत्वाची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. विविध जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळून समाजासाठी योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान



व्यक्तिमत्त्वाचा गौरव करताना मनस्वी आनंद होत असल्याचे बी द चेंज फाउंडेशनच्या वतीने सांगण्यात आले. सविता केदारे यांच्या कार्याची दखल घेत त्यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवर, सहकारी, मित्रपरिवार तसेच 'आम्ही भारताचे लोक' आंबेडकरी सांस्कृतिक चळवळीच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या पुढील सामाजिक, शैक्षणिक आणि साहित्यिक वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. बी द चेंज फाउंडेशनच्या वतीने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल मिस इंजि. सविता सावित्रीबाई निंबाजी केदारे यांना प्रतिष्ठेचा 'महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. इंजिनीयर, लेखिका आणि कवयित्री म्हणून स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करत असतानाच सविता केदारे यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातही सातत्यपूर्ण योगदान दिले आहे. कौटुंबिक जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळत त्यांनी सामाजिक कार्यासाठी वेळ देत विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक तसेच कौटुंबिक क्षेत्रातील उल्लेखनीय कर्तृत्वाची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

'रक्तदानामुळे अशक्तपणा येतो हा गैरसमज

जन सम्राट टाईम्स

भडगाव । प्रतिनिधी: 'रक्तदानासारखे दुसरे पुण्य नाही' हे केवळ शब्दांत न सांगता आपल्या कृतीतून सिद्ध करणारे प्राथमिक आरोग्य केंद्र, पिंपरखेड येथील आरोग्य निरीक्षक संजय सोनार कळवाडीकर यांनी आजपर्यंत तब्बल ३० वेळा ऐच्छिक रक्तदान केले आहे. त्यांच्या या सामाजिक योगदानातून रक्तदानाबाबत जनजागृती करण्याचा आदर्श निर्माण



झाला आहे. १ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय ऐच्छिक रक्तदान दिन साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर संजय सोनार यांनी नागरिकांनी स्वेच्छेने रक्तदान करण्याचे आवाहन केले आहे.

रक्तदानाबाबत समाजात असलेल्या गैरसमजांवर मात करून तरुणांनी पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. "माझ्या ३० व्या रक्तदानानंतरही मी पूर्णपणे तंदुरुस्त आहे. रक्तदान केल्याने अशक्तपणा येतो, हा गैरसमज आहे. रक्ताची गरज असलेल्या रुग्णांसाठी रक्तदान अत्यंत महत्त्वाचे आहे. 'रक्तदानासारखे दुसरे पुण्य नाही' हे केवळ शब्दांत न सांगता आपल्या कृतीतून सिद्ध करणारे प्राथमिक आरोग्य केंद्र, पिंपरखेड येथील आरोग्य निरीक्षक संजय सोनार कळवाडीकर यांनी आजपर्यंत तब्बल ३० वेळा ऐच्छिक रक्तदान केले आहे.

उपवर्गीकरणाला मिळाला मुहूर्त; शासनाची आंदोलकांना लेखी हमी

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकण करण्याचा निर्णय राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान २५ मार्च पूर्वी घेतला जाईल, अशी लेखी हमी सामाजिक न्याय विभागाने सकल मातंग समाजाच्या नेत्यांना दिली आहे. शासनाचा हा निर्णय मान्य करत मातंग समाजाच्या आंदोलकांनी मंगळवारी मध्यरात्री छत्रपती शिवाजी टर्मिनसचा परिसर खाली केला आहे. मातंग समाजाने उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी मुंबईत मंगळवारी महानिर्धार आंदोलन पुकारले होते. सुमारे २५ हजार कार्यकर्ते राज्यभरातून या आंदोलनात सहभागी झाले होते. उपवर्गीकरणाचा निर्णय होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, असा पवित्रा घेत छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर आंदोलकांनी दिवसभर ठिय्या दिला होता. भाजपचे आमदार अमित गोरखे, जितेश अंतापूरकर, सुनील कांबळे यांच्या शिष्टमंडळाने सरकारबरोबर मंगळवारी रात्री चर्चेच्या दोन फेऱ्या झाल्यानंतर लेखी हमी घेवून आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर रात्री १२ वाजता जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी सीएसटीला आंदोलनस्थळी येत त्याबाबत घोषणा केली.आंदोलन मागे घेण्याप्रकरणी आंदोलकांमध्ये दोन गट पडले आहेत. भाजप



आमदार विरोधात शिवसेना नेते असे त्याला स्वरुप आले आहे. अवर सचिवांच्या लेखी हमीवर आंदोलन मागे घेवून मातंग समाजाच्या नेत्यांनी समाजाची फसवणूक केल्याचा आरोप शिंदे शिवसेनेचे नेते व सकल मातंग समाजाचे नांदेडचे राज्य समन्वयक मारोती वाडेकर यांनी केला आहे. मुख्य सचिवांची लेखी हमी घेऊनच आंदोलन मागे घेतले पाहिजे होते, अशी भूमिका वाडेकर यांनी मांडली.राज्यात सध्या विविध खात्यांमध्ये नोकर भरती चालू आहे. उपवर्गीकरण लांबल्याने त्याचा फटका अनुसूचित जातींमधील वंचित जातींना बसणार आहे. त्यामुळे सदर भरती तरी स्थगीत करावी किंवा उपवर्गीकरण तत्काळ लागू करावे, अशी मागणी मातंग समाजाकडून होत आहे. मंगळवारी मुंबईत पार पडलेल्या महानिर्धार आंदोलनाला सरकारी आंदोलन म्हणून समाज माध्यमावर काहींनी टीका केली.न्या. बदर समितीने उपवर्गीकरणाच्या शिफारशींचा अहवाल १६ मार्चला राज्य सरकारला सादर केला आहे. या अहवालावर सुमारे १ लाख हरकती व सूचना बार्टी संस्थेला प्राप्त झाल्या आहेत. त्या सूचनांचे विश्लेषण करण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिवांची समिती काम करत आहे.

पावसाने पाठ फिरवल्याने राज्यात 1986 गाव-वाड्या तहानलेली

राज्यात पाणीटंचाईचा मोठा प्रश्न निर्माण ; १० जिल्ह्यांत ४६९ टँकरद्वारे पाणीपुरवठा

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी : अघोरी राज्यातील ३०८हून अधिक तालुक्यांत दुष्काळ जाहीर झाला असतानाच राज्यात पाणीटंचाईचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. राज्यातील काही भागांत पाणीटंचाईची स्थिती निर्माण झाल्याने टंचाईग्रस्त गाव-वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सरकारी आकडेवारीनुसार, राज्यातील १० जिल्ह्यांमधील ४१८ गावे आणि १ हजार ५६८ वाड्यांना टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरवले जात आहे. त्यासाठी एकूण ४७८ टँकर धावत आहेत.त्यापैकी १० शासकीय, तर ४६९ खासगी टँकर आहेत.

पाणीटंचाईची ही स्थिती प्रामुख्याने राज्यातील मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये दिसून येत आहे. नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि धाराशिव या जिल्ह्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. मात्र दर आठवड्याला ही परिस्थिती अधिक चिंताजनक होत आहे. आकडेवारीनुसार ७ ते १३ सप्टेंबर दरम्यान राज्यातील ३६२ गावे आणि १ हजार ३५४ वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात होता. त्यावेळी ४११ टँकर कार्यरत होते. त्यानंतरच्या आठवड्यात



म्हणजेच १४ ते २० सप्टेंबर या काळात टंचाईग्रस्त गावांची संख्या ३६२ वरून ४१८ वर पोहोचली, म्हणजेच ५६ गावांची वाढ झाली आहे. तसेच टँकरवर अवलंबून असलेल्या वाड्यांची संख्याही २१४ ने वाढून १ हजार ५६८ झाली आहे. मात्र, एकूण टँकरची संख्या मागील आठवड्याच्या तुलनेत ४११ वरून ४७९ वर आली आहे. यामध्ये शासकीय टँकरची संख्या १० इतकीच असून खासगी टँकरची संख्या वाढलेली आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि धाराशिव या मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये टँकरची मागणी कायम आहे. विशेषतः ग्रामीण भागातील विहिरी, बोअरवेल तसेच अन्य स्थानिक जलस्रोतांमधील उपलब्ध पाण्यावर मोठा ताण निर्माण झाला आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर, सांगली आणि सातारा या जिल्ह्यांतील काही भागांतही टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतही टंचाईग्रस्त गावांना टँकरच्या माध्यमातून पाणी देण्यात येत आहे. पावसाचा खंड वाढल्यास टंचाईग्रस्त गावांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे.राज्यातील ३०८हून अधिक तालुक्यांत दुष्काळ जाहीर झाला असतानाच राज्यात पाणीटंचाईचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. राज्यातील काही भागांत पाणीटंचाईची स्थिती निर्माण झाल्याने टंचाईग्रस्त गाव-वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सरकारी आकडेवारीनुसार, राज्यातील १० जिल्ह्यांमधील ४१८ गावे आणि १ हजार ५६८ वाड्यांना टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरवले जात आहे. त्यासाठी एकूण ४७८ टँकर धावत आहेत.त्यापैकी १० शासकीय, तर ४६९ खासगी टँकर आहेत.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

शक्तीपीठ महामार्गाच्या भूसंपादनाला वेग!

हा महामार्ग ८५६.७६५ किमी लांबीचा असून राज्यातील १३ जिल्ह्यांमधून जाणार

जन सम्राट टाईम्स

नाशिका प्रतिनिधी: नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनाच्या कामाला महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) गती दिली आहे. भूसंपादन प्रक्रियेअंतर्गत आतापर्यंत महामार्गाच्या आखणीतील १२९ गावांमधील १०० टक्के संयुक्त मोजणी पूर्ण झाली. शेतकऱ्यांच्या सहकार्यामुळे ही मोजणी पूर्ण झाली असून उर्वरित गावांतील संयुक्त मोजणीचे काम प्रगतीपथावर आहे. भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करून निविदा प्रक्रिया राबवून या प्रकल्पाच्या कामाला तातडीने सुरुवात करण्याचे एमएसआरडीसीचे नियोजन आहे. मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गामुळे नागपूर-मुंबई प्रवास अतिजलद झाला आहे. ७०१ किमीच्या या महामार्गाच्या धर्तीवर राज्यात आणखी एक मोठा महामार्ग बांधून विदर्भाला कोकणाशी जोडण्याचा निर्णय एमएसआरडीसीने घेतला. त्यानुसार नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गाची आखणी करण्यात आली. एमएसआरडीसीच्या संरेखनानुसार हा महामार्ग ८५६.७६५ किमी लांबीचा असून राज्यातील १३ जिल्ह्यांमधून हा महामार्ग जाणार आहे. वर्धा येथील पवनार येथून सुरू होऊन हा महामार्ग सिंधुदुर्ग येथील पत्रादेवी येथे येऊन संपणार आहे. या महामार्गाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दृष्टीने सध्या भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे. भूसंपादन प्रक्रियेअंतर्गत सध्या गावांची संयुक्त मोजणी सुरू आहे.दरम्यान, या महामार्गाला सिंधुदुर्ग, रत्नागिरी, कोल्हापूर व अन्य जिल्ह्यांमध्ये तीव्र विरोध आहे. याविरोधात अनेक जिल्ह्यांमध्ये



जनआंदोलनही उभारण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर मूळ संरेखनात बदल करून सुधारित संरेखन तयार करण्यात आले आहे. हे संरेखन अंतिम करण्यात आले आहे. मात्र, त्यानंतरही शक्तिपीठला विरोध कायम असून हा महामार्ग रद्द करण्याची मागणी शेतकऱ्यांची आहे. असे असताना दुसरीकडे मात्र एमएसआरडीसीकडून संयुक्त मोजणीचे काम वेगात सुरू आहे. शेतकऱ्यांशी चर्चा करून त्यांचा विश्वास संपादित करून संयुक्त मोजणी केली जात असल्याची माहिती एमएसआरडीसीतील अधिकाऱ्यांनी दिली.अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार १३ जिल्ह्यांतील ४० तालुक्यांतील ४०९ गावांमध्ये संयुक्त मोजणी केली जात आहे. यातील १२९ गावांची संयुक्त मोजणी पूर्ण झाली आहे. १५ गावांमध्ये संयुक्त मोजणीची प्रक्रिया अंशत: पूर्ण झाली असून २६५ गावांमध्ये मोजणीचे काम प्रगतिपथावर आहे. शेतकऱ्यांशी संवाद सुरू आहे. संयुक्त मोजणी पूर्ण झालेल्या १२९ गावांमध्ये वर्धा जिल्ह्यातील दोन तालुक्यांतील २० गावांचा, यवतमाळ जिल्ह्यातील सहा तालुक्यांतील ७० गावांचा समावेश आहे. तर मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यात एका तालुक्यातील ११ गावांमध्ये तर हिंगोली जिल्ह्यातील तीन तालुक्यांतील ४० गावांत, परभणी जिल्ह्यातील दोन तालुक्यांतील सहा गावांत तसेच बीडमधील दोन तालुक्यांतील आठ गावांमध्ये संयुक्त मोजणी पूर्ण झाली आहे.लातूर जिल्ह्यातील तीन तालुक्यांतील चार गावांची संयुक्त मोजणी झाली असून आठ गावांची संयुक्त मोजणी अंशत: झाली आहे. धाराशिव जिल्ह्यातील एका तालुक्यातील आठ गावांची संयुक्त मोजणी पूर्ण झाली असून पाच गावांतील संयुक्त मोजणी अंशत: झाली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये संयुक्त मोजणी संदर्भात शेतकऱ्यांसोबत संवाद प्रक्रिया सुरू आहे. नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनाच्या कामाला महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) गती दिली आहे. भूसंपादन प्रक्रियेअंतर्गत आतापर्यंत महामार्गाच्या आखणीतील १२९ गावांमधील १०० टक्के संयुक्त मोजणी पूर्ण झाली. शेतकऱ्यांच्या सहकार्यामुळे ही मोजणी पूर्ण झाली असून उर्वरित गावांतील संयुक्त मोजणीचे काम प्रगतीपथावर आहे. भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करून निविदा प्रक्रिया राबवून या प्रकल्पाच्या कामाला तातडीने सुरुवात करण्याचे एमएसआरडीसीचे नियोजन आहे. मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गामुळे नागपूर-मुंबई प्रवास अतिजलद झाला आहे. ७०१ किमीच्या या महामार्गाच्या धर्तीवर राज्यात आणखी एक मोठा महामार्ग बांधून विदर्भाला कोकणाशी जोडण्याचा निर्णय एमएसआरडीसीने घेतला. त्यानुसार नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गाची आखणी करण्यात आली. एमएसआरडीसीच्या संरेखनानुसार हा महामार्ग ८५६.७६५ किमी लांबीचा असून राज्यातील १३ जिल्ह्यांमधून हा महामार्ग जाणार आहे. वर्धा येथील पवनार येथून सुरू होऊन हा महामार्ग सिंधुदुर्ग येथील पत्रादेवी येथे येऊन संपणार आहे. या महामार्गाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दृष्टीने सध्या भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे. भूसंपादन प्रक्रियेअंतर्गत सध्या गावांची संयुक्त मोजणी सुरू आहे.दरम्यान, या महामार्गाला सिंधुदुर्ग, रत्नागिरी, कोल्हापूर व अन्य जिल्ह्यांमध्ये तीव्र विरोध आहे. याविरोधात अनेक जिल्ह्यांमध्ये जनआंदोलनही उभारण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर मूळ संरेखनात बदल करून सुधारित संरेखन तयार करण्यात आले आहे. हे संरेखन अंतिम करण्यात आले आहे. मात्र, त्यानंतरही शक्तिपीठला विरोध कायम असून हा महामार्ग रद्द करण्याची मागणी शेतकऱ्यांची आहे. असे असताना दुसरीकडे मात्र एमएसआरडीसीकडून संयुक्त मोजणीचे काम वेगात सुरू आहे. शेतकऱ्यांशी चर्चा करून त्यांचा विश्वास संपादित करून संयुक्त मोजणी केली .

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

शिखरजी तीर्थयात्रा यशस्वी; ५११ भाविकांचा पुण्याकडे परतीचा प्रवास



जन सम्राट टाईम्स

मधुबन | प्रतिनिधी पुणे येथून २६ सप्टेंबर रोजी श्री सम्मेद शिखरजी तीर्थक्षेत्राच्या दर्शनासाठी रवाना झालेल्या ५११ भाविकांची तीर्थयात्रा यशस्वीरीत्या पूर्ण झाली. भाविकांनी श्रद्धा, भक्तिभाव आणि धार्मिक उत्साहात सम्मेद शिखरजी येथे तीर्थवंदना करून विविध धार्मिक स्थळांचे दर्शन घेतले. यात्रेदरम्यान भाविकांनी सामूहिक प्रार्थना, पूजन तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांत सहभाग घेतला. तीर्थवंदना आणि दर्शनाचा कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर सर्व ५११ भाविक पुण्याकडे परतीच्या प्रवासाला रवाना झाले आहेत. भक्तिमय वातावरणात धार्मिक कार्यक्रम सम्मेद शिखरजी तीर्थक्षेत्रातील दर्शन आणि तीर्थवंदनेमुळे भाविकांना आध्यात्मिक समाधानाचा अनुभव मिळाला. संपूर्ण यात्रेदरम्यान भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. धार्मिक स्थळांचे दर्शन घेताना भाविकांनी सामूहिक प्रार्थना व पूजनात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. ही तीर्थयात्रा यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल सर्व भाविकांनी आयोजक श्री. स्वप्निल पाटणी व पाटणी परिवाराचे आभार व्यक्त केले. यात्रेचे नियोजन, आयोजन आणि सहकार्याबद्दल भाविकांनी समाधान व्यक्त केले. पुणे येथून २६ सप्टेंबर रोजी श्री सम्मेद शिखरजी तीर्थक्षेत्राच्या दर्शनासाठी रवाना झालेल्या ५११ भाविकांची तीर्थयात्रा यशस्वीरीत्या पूर्ण झाली. भाविकांनी श्रद्धा, भक्तिभाव आणि धार्मिक उत्साहात सम्मेद शिखरजी येथे तीर्थवंदना करून विविध धार्मिक स्थळांचे दर्शन घेतले. यात्रेदरम्यान भाविकांनी सामूहिक प्रार्थना, पूजन तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांत सहभाग घेतला. तीर्थवंदना आणि दर्शनाचा कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर सर्व ५११ भाविक पुण्याकडे परतीच्या प्रवासाला रवाना झाले आहेत. भक्तिमय वातावरणात धार्मिक कार्यक्रम सम्मेद शिखरजी तीर्थक्षेत्रातील दर्शन आणि तीर्थवंदनेमुळे भाविकांना आध्यात्मिक समाधानाचा अनुभव मिळाला. संपूर्ण यात्रेदरम्यान भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. धार्मिक स्थळांचे दर्शन घेताना भाविकांनी सामूहिक प्रार्थना व पूजनात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. ही तीर्थयात्रा यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल सर्व भाविकांनी आयोजक श्री. स्वप्निल पाटणी व पाटणी परिवाराचे आभार व्यक्त केले. यात्रेचे नियोजन, आयोजन आणि सहकार्याबद्दल भाविकांनी

अशोक सूर्यवंशी यांना तीन राज्यस्तरीय पुरस्कारांचा बहुमान

आदर्श शिक्षक, जीवनगौरव आणि आदर्श पुरस्काराने गौरव

जन सम्राट टाईम्स

कर्जत । प्रतिनिधी : अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथील नूतन मराठी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक, सुप्रसिद्ध निवेदक, पत्रकार तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य प्रवक्ते अशोक विश्वनाथ सूर्यवंशी यांना लोक परिवर्तन वृत्तपत्र समूहाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात तीन प्रतिष्ठेच्या राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

लोक परिवर्तन वृत्तपत्र समूहाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या पुरस्कार सोहळ्यात अशोक सूर्यवंशी यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६, राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार २०२६ आणि राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्याध्यक्ष दत्ता गाडगे, दैनिक लोक परिवर्तनचे संपादक



आबासाहेब शिरसाट तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. शिक्षण, पत्रकारिता आणि सामाजिक कार्याचा संगम अशोक सूर्यवंशी हे शिक्षण, पत्रकारिता, निवेदन आणि सामाजिक कार्य अशा विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यासोबतच सामाजिक जनजागृती आणि पत्रकारितेच्या माध्यमातून विविध सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य ते करीत आहेत. मुख्याध्यापक म्हणून शैक्षणिक क्षेत्रातील योगदान, प्रभावी निवेदक म्हणून विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांतील सहभाग तसेच पत्रकार म्हणून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी केलेले प्रयत्न या विविध कार्यांची दखल घेत त्यांना तीन राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले. एकाच व्यासपीठावर तीन पुरस्कारांचा सन्मान शिक्षण क्षेत्रातील कार्याची दखल घेत आदर्श शिक्षक पुरस्कार, विविध क्षेत्रांतील योगदानाबद्दल जीवनगौरव पुरस्कार, तर पत्रकारितेतील कार्याबद्दल आदर्श पत्रकारिता पुरस्कार प्रदान करण्यात आला. एकाच सोहळ्यात तीन राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरव झाल्याने अशोक सूर्यवंशी यांच्या कार्याची विविध क्षेत्रांतून दखल घेतली गेल्याचे चित्र आहे.

तिनसमाळ येथे महिला शेतकरी प्रमाणपत्र शिबिराला उदंड प्रतिसाद

जन सम्राट टाईम्स

धडगाव (प्रतिनिधी): महिलांना शेती क्षेत्रात 'शेतकरी' म्हणून स्वतंत्र व अधिकृत ओळख मिळवून देण्याच्या उद्देशाने तिनसमाळ येथे आयोजित करण्यात आलेल्या 'महिला शेतकरी प्रमाणपत्र' नोंदणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जय जोहार फाऊंडेशन आणि जोहार आदिवासी महिला बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरात परिसरातील ७० आदिवासी महिलांनी नोंदणी केली. ग्रामीण व आदिवासी भागातील शेती व्यवस्थेत महिलांचा मोठा सहभाग असतो. मात्र, अनेक महिलांकडे शेतकरी म्हणून अधिकृत कागदपत्रे नसल्याने विविध शासकीय योजना, कृषी अनुदान, प्रशिक्षण आणि इतर सुविधांचा लाभ घेताना अडचणी येतात.

ही बाब लक्षात घेऊन महिलांना आवश्यक प्रमाणपत्रासाठी नोंदणीची सुविधा गावातच उपलब्ध करून देण्यात आली. ऑनलाइन प्रक्रियेतील अडचणी दूर करण्याचा प्रयत्न दुर्गम भागातील महिलांना ऑनलाइन अर्ज भरताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर व्हाव्यात, तसेच



अर्जासाठी तालुका किंवा इतर ठिकाणी जाण्याचा वेळ आणि प्रवास खर्च वाचावा, या उद्देशाने हे शिबिर थेट गावात आयोजित करण्यात आले. शिबिरादरम्यान जोहार आदिवासी महिला बचत गटाच्या अध्यक्षा मनिषा पावरा यांनी महिलांचे ऑनलाइन अर्ज भरून देत आवश्यक मार्गदर्शन केले.

जय जोहार फाऊंडेशनचे अध्यक्ष लक्ष्मण पावरा यांनी तांत्रिक सहकार्य केले. तसेच कल्पना पावरा आणि दीपक पावरा यांनी शिबिराच्या आयोजनासाठी मोलाची साथ दिली. ग्रामीण व आदिवासी भागातील महिलांमध्ये आपल्या हक्कांविषयी तसेच शासकीय योजनांबाबत वाढत असलेली जागृती सकारात्मक असल्याचे आयोजकांनी सांगितले. महिलांना शासकीय सुविधा आणि योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी भविष्यातही अशा प्रकारचे उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले. महिलांना शेती क्षेत्रात 'शेतकरी' म्हणून स्वतंत्र व अधिकृत ओळख मिळवून देण्याच्या उद्देशाने तिनसमाळ येथे आयोजित करण्यात आलेल्या 'महिला शेतकरी प्रमाणपत्र' नोंदणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जय जोहार फाऊंडेशन आणि जोहार आदिवासी महिला बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरात परिसरातील ७० आदिवासी महिलांनी नोंदणी केली. ग्रामीण व आदिवासी भागातील शेती व्यवस्थेत महिलांचा मोठा सहभाग असतो.

तालुक्याची पैसेवारी ५० पैशांच्या आत करा, शेतकरी संघटनेचे निवेदन

जन सम्राट टाईम्स

भडगाव । प्रतिनिधी: यंदाच्या खरीप हंगामात पावसाचे असमान वितरण, पावसातील दीर्घ खंड तसेच काही भागांत झालेल्या अत्यल्प पावसामुळे पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी अपेक्षित उत्पादन मिळाले नसल्याने भडगाव तालुक्यातील खरीप पिकांची अंतिम पैसेवारी ५० पैशांच्या आत निश्चित करावी, अशी मागणी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष अखिलेश रविंद्र पाटील यांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे. तालुक्यातील अनेक गावांमध्ये कापूस, मका, सोयाबीन, बाजरी, ज्वारी, भाजीपाला तसेच अन्य खरीप पिकांच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाल्याचे शेतकरी संघटनेने निवेदनात नमूद केले आहे. पावसातील खंड आणि प्रतिकूल हवामानामुळेउत्पादनात घट होण्याची शक्यता असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. प्रत्यक्ष शेतात जाऊन पीक पाहणीची मागणी पिकांच्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ चित्र समोर यावे यासाठी प्रत्येक गावातील पिकांची प्रत्यक्ष व पारदर्शक पाहणी करण्यात यावी,



अशी मागणी कर यंदाच्या खरीप हंगामात पावसाचे असमान वितरण, पावसातील दीर्घ खंड तसेच काही भागांत झालेल्या अत्यल्प पावसामुळे पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी अपेक्षित उत्पादन मिळाले नसल्याने भडगाव तालुक्यातील खरीप पिकांची अंतिम पैसेवारी ५० पैशांच्या आत निश्चित करावी, संघटनेचे तालुकाध्यक्ष अखिलेश रविंद्र पाटील यांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे. अन्य खरीप पिकांच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाल्याचे शेतकरी संघटनेने निवेदनात नमूद केले आहे. पावसातील खंड आणि प्रतिकूल हवामानामुळे पिकांची वाढ खुंटली असून, प्रत्यक्ष शेतात जाऊन पीक पाहणीची मागणी पिकांच्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ चित्र समोर यावे यासाठी प्रत्येक गावातील पिकांची प्रत्यक्ष व पारदर्शक पाहणी करण्यात यावी.

दापोरे येथे 'शिक्षण परिषद' उत्साहात संपन्न

निपुण महाराष्ट्र अभियान, SQAAF मूल्यांकन व शैक्षणिक गुणवत्तावाढीवर सखोल मंथन

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दापोरे, ता. जळगाव येथे बुधवार, दि. ३० सप्टेंबर रोजी दुपारी १ ते ५ या वेळेत 'शिक्षण परिषद (पुष्प २ रे)' उत्साहपूर्ण आणि शैक्षणिक वातावरणात संपन्न झाली. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, शिक्षकांना आवश्यक मार्गदर्शन मिळवून देणे तसेच शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शैक्षणिक विषयांवर परिषदेत सखोल मंथन करण्यात आले. शिक्षण परिषदेच्या अध्यक्षस्थानी केंद्रसमन्वयक माधवी वाघ होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अनिल झोपे (प्राचार्य, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था), अजित तडवी (गटशिक्षणाधिकारी, जळगाव), सचिन मगर (शालेय पोषण आहार अधीक्षक वर्ग-२, जळगाव), विजय पवार (प्रभारी गटशिक्षणाधिकारी, पाचोरा) तसेच जितेंद्र चिंचोले (शि. वि. अधिकारी, शिरसोली बीट, पंचायत समिती जळगाव) उपस्थित होते. निपुण महाराष्ट्र व SQAAF मूल्यांकनावर चर्चा परिषदेत निपुण महाराष्ट्र अभियान, शाळानिहाय प्रगतीचा आढावा, जिल्हास्तरावरून मिळालेल्या सहकार्याच्या आधारे SQAAF विश्लेषण, SQAAF मूल्यांकनात सुधारणा करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, आनापान ॲप, त्रैमासिक पालक सभा, पाठ नियोजन तसेच राज्यस्तरीय धोरणात्मक आणि स्थानिक



शैक्षणिक विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी कांचन राणे यांनी 'वीर गाथा' उपक्रमाबाबत मार्गदर्शन केले. केंद्रसमन्वयक माधवी वाघ यांनी समग्र प्रगती पत्रकाचा आढावा घेतला. तसेच शिक्षण परिषदेची लिंक भरण्याबाबत उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले. शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी विचारमंथन कार्यक्रमाची सुरुवात प्रास्ताविक, अध्यक्ष निवड, ईशस्तवन आणि प्रमुख पाहुण्यांच्या स्वागताने झाली. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, विविध शैक्षणिक उपक्रम, शाळेची गुणवत्ता, मूल्यमापन प्रक्रिया आणि आगामी शैक्षणिक नियोजन या विषयांवर उपस्थित शिक्षकांनी विचारमंथन केले. मुख्याध्यापक गोपीचंद दादाजी भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण परिषद यशस्वीरीत्या पार पडली. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि संबंधितांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शालेय पोषण आहाराचे सकाळी वाटप करून शिक्षक व संबंधितांनी शिक्षण परिषदेस उपस्थिती लावली. शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी मिळालेले मार्गदर्शन तसेच विविध विषयांवरील चर्चेमुळे परिषद फलदायी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. जि. प. उच्च प्राथमिक शाळा दापोरे आणि केंद्रसमन्वयक, शिरसोली यांच्या संयुक्त आयोजनातून ही शिक्षण परिषद उत्साहपूर्ण व शैक्षणिक वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाली.जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दापोरे, ता. जळगाव येथे बुधवार, दि. ३० सप्टेंबर रोजी दुपारी १ ते ५ या वेळेत 'शिक्षण परिषद (पुष्प २ रे)' उत्साहपूर्ण आणि शैक्षणिक वातावरणात संपन्न झाली. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, शिक्षकांना आवश्यक मार्गदर्शन मिळवून देणे तसेच शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शैक्षणिक विषयांवर परिषदेत सखोल मंथन करण्यात आले.

जळगावात जैन समाजातर्फे गुणवंत विद्यार्थी गौरव

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: श्री दिगंबर जैन बहुउद्देशीय मंडळ आणि दिगंबर जैन महिला मंडळ, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने 'गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा व पर्युषण महापर्वानिमित्त महाप्रसाद' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी करण्यात आले आहे. प.पू. श्री १०८ तरुण सागर महाराज यांच्या प्रेरणेने तसेच प.पू. श्री १०८ आस्तिकय सागरजी व विनियोग सागर महाराजजी यांच्या आशीर्वादाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. जळगाव शहरातील ब्राह्मणसभा मंगल कार्यालय, बळीराम पेठ येथे हा सोहळा पार पडणार आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा होणार गौरव समाजातील शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा या कार्यक्रमात गौरव करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन देणे तसेच समाजातील इतर विद्यार्थ्यांना शिक्षणाची प्रेरणा मिळावी, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. 'भावना अच्छी हो तो, कार्य भी अच्छे होते हैं!' या प्रेरणादायी संदेशासह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पर्युषण महापर्वानिमित्त महाप्रसाद गुणगौरव सोहळ्यानंतर पर्युषण महापर्वानिमित्त दुपारी १२ ते २ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या महाप्रसादाचा सर्व धर्मप्रेमी नागरिकांनी सहकुटुंब उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन श्री दिगंबर जैन बहुउद्देशीय मंडळ व दिगंबर जैन महिला मंडळ, जळगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

दुष्काळाच्या सावटात पाण्यासाठी ‘युद्धपातळी’ची तयारी!

पाणीपुरवठा योजना तातडीने सुरू करा; जलस्रोत संरक्षण, नाला खोलीकरणाला प्राधान्य

जन सम्राट टाईम्स

मुंबई/नाशिक/पुणे/जळगाव, । प्रतिनिधी: राज्यातील विविध भागांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आगामी काळातील संभाव्य पाणीटंचाईला सामोरे जाण्यासाठी उपलब्ध पाणीसाठ्याचे आतापासूनच काटेकोर नियोजन करा, असे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले. जलस्रोतांचे संरक्षण, नाला खोलीकरण आणि जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर हाती घेण्यासोबतच ७५ टक्क्यांपेक्षा अधिक काम पूर्ण झालेल्या पाणीपुरवठा योजना तातडीने कार्यान्वित करण्यावर भर देण्याचे त्यांनी सांगितले. छत्रपती संभाजीनगर, नाशिक आणि पुणे विभागातील जिल्ह्यांमधील संभाव्य पाणीटंचाई आणि त्यावरील उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत मंत्री पाटील बोलत होते. बैठकीस पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री मेघना दीपक साकोरे-बोर्डीकर, अपर मुख्य सचिव पराग जैन-नैनुटिया, संबंधित विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. टंचाई येण्यापूर्वीच नियोजन करा संभाव्य पाणीटंचाई निर्माण करण्याऐवजी तिची तीव्रता वाढू नये, यासाठी आतापासूनच पुढील कालावधीतील पाणी उपलब्धतेचे नियोजन करणे आवश्यक असल्याचे गुलाबराव पाटील यांनी सांगितले.

प्रत्येक जिल्ह्याने धरणे, तलाव, विहिरी आणि अन्य जलस्रोतांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा वस्तुनिष्ठ आढावा घ्यावा. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देत उपलब्ध साठा किती काळ पुरेल, कोणत्या भागांत पर्यायी स्रोतांची गरज भासू शकते आणि कुठे अतिरिक्त उपाययोजना करावी लागेल, याचे सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी दिले. ७५ टक्क्यांपेक्षा अधिक पूर्ण झालेल्या पाणीपुरवठा योजनांची कामे ७५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक पूर्ण झाली आहेत आणि उपलब्ध जलस्रोताच्या माध्यमातून पाणीपुरवठा करणे शक्य आहे, अशा योजना तातडीने कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले. प्रशासकीय, तांत्रिक, नळजोडणी किंवा अंमलबजावणीतील अन्य अडचणींमुळे योजना रखडलेल्या असल्यास संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी विविध यंत्रणांमध्ये समन्वय साधून त्या अडचणी दूर कराव्यात. नागरिकांना लवकर पाणी उपलब्ध होऊ शकणाऱ्या जवळपास पूर्ण झालेल्या योजना किरकोळ अडथळ्यांमुळे प्रलंबित राहू नयेत, यासाठी जिल्हानिहाय छाननी करण्याचेही निर्देश देण्यात आले. नाला खोलीकरणासाठी सीएसआर निधीचाही वापर जलसंधारणाच्या कामांना गती देताना नाला खोलीकरणासाठी उपलब्ध शासकीय निधीसोबतच कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (CSR) निधीच्या माध्यमातूनही प्रयत्न करण्याची गरज मंत्री पाटील यांनी व्यक्त केली. नाला खोलीकरण, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन आणि पाणी साठवण क्षमता वाढविणाऱ्या कामांचा दीर्घकालीन फायदा होत असल्याने स्थानिक गरज आणि भौगोलिक परिस्थितीनुसार अशी कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.



शिरपूर पॅटर्नच्या माध्यमातून झालेल्या जलसंधारणाच्या कामांचा संबंधित भागातील पाणी उपलब्धतेला फायदा झाल्याचे नमूद करत, स्थानिक परिस्थितीनुसार उपयुक्त ठरणाऱ्या अशा जलसंधारणाच्या उपाययोजना अन्य भागांतही राबविण्याबाबत प्रयत्न करण्याचे निर्देश त्यांनी दिले. जलस्रोतांचे संरक्षण ही सामूहिक जबाबदारी उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन ही केवळ ग्रामपंचायतीची जबाबदारी नसून संबंधित सर्व शासकीय आणि स्थानिक यंत्रणांची सामूहिक जबाबदारी असल्याचे मंत्री पाटील यांनी स्पष्ट केले. तलाव, धरणे आणि अन्य जलस्रोतांमधील उपलब्ध पाण्याचे प्रमाण लक्षात घेऊन त्याचा काटेकोर आणि नियोजनबद्ध वापर करावा. जलस्रोतांचे संरक्षण, नाला खोलीकरण आणि पाणी साठवण क्षमता वाढविणाऱ्या कामांसाठी उपलब्ध निधीचा वेळेत व परिणामकारक वापर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. १५ ऑक्टोबरपूर्वी टंचाई निवारणाचे सूक्ष्म नियोजन संभाव्य पाणीटंचाई निवारणासाठी आवश्यक प्राथमिक नियोजन १५ ऑक्टोबरपूर्वी पूर्ण ठेवावे, तसेच पुढील कालावधीतील पाणी उपलब्धतेचा अंदाज घेऊन टंचाईग्रस्त भागांसाठी पर्यायी उपाययोजनांची तयारी ठेवावी, असे निर्देश बैठकीत देण्यात आले. टँकरवरील अवलंबित्व शक्य तितके कमी करण्यासाठी तात्पुरत्या उपायांपेक्षा कायमस्वरूपी पाणीपुरवठा आणि जलसंधारणाच्या उपाययोजनांना प्राधान्य देण्यावर बैठकीत भर देण्यात आला. महाराष्ट्राच्या पाणीपुरवठा विभागाकडून सप्टेंबर २०२६ मधील टँकर अहवाल नियमितपणे प्रसिद्ध केले जात आहेत.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

‘विकसित भारत २०४७’ विषयावर सारोळा शाळेत चित्रकला स्पर्धा



जन सम्राट टाईम्स

जामखेड | प्रतिनिधी: जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सारोळा, केंद्र राजुरी, ता. जामखेड येथे मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी सेवा संकल्प अभियानांतर्गत ‘विकसित भारत २०४७’ या विषयावर आधारित चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध कल्पना आणि रंगांच्या माध्यमातून विकसित भारताची संकल्पना चित्रांमध्ये साकारत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या उपक्रमासाठी सारोळा गावचे माजी सरपंच तथा जिल्हा नियोजन समिती सदस्य अजयदादा काशिद यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी शालेय जीवनातील कलेचे महत्त्व, चित्रकलेतील स्वतःचे अनुभव तसेच दुष्काळासारख्या परिस्थितीत विद्यार्थ्यांची सामाजिक जबाबदारी याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी भारताच्या विकासाशी संबंधित विविध विषयांवरही विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी चित्रांतून मांडली विकसित भारताची संकल्पना स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी विकसित भारत, पर्यावरण, तंत्रज्ञान, शिक्षण, स्वच्छता, सामाजिक विकास आदी विविध संकल्पना चित्रांच्या माध्यमातून मांडल्या. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी साकारलेल्या चित्रांचे बारकाईने निरीक्षण करून त्यांच्या कलाकृतीमागील आशय जाणून घेतला.

इयत्ता पाचवीतील विद्यार्थिनी आर्या उमेश भोगे हिने ‘विकसित भारत’ या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. उत्कृष्ट चित्रकला सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. अजयदादा काशिद यांचा विशेष सन्मान श्रीराम, भोलेनाथ आणि संत मीराबाई यांच्या कलाकृती स्वतः साकारल्याबद्दल अजयदादा काशिद यांचा शाळेच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. कला हे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, कल्पनाशक्ती आणि सामाजिक जाणिवांना आकार देणारे प्रभावी माध्यम आहे.सर्जनशील दृष्टीने पाहण्याची संधी मिळते. शिक्षक, पालक व ग्रामस्थांची उपस्थिती कार्यक्रमास ग्रामसेवक निलेश टेकाळे, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर जगदाळे, ग्रेड मुख्याध्यापक संदीप भालसिंग, पालक सदस्य योगेश मुळे, किरण काळे, निलेश थोरात, माजी विद्यार्थिनी शिवकन्या मनोज सातपुते, पदवीधर शिक्षक सुरेश बर्वे, राहुल लिमकर, उपाध्यापक प्रशांत होळकर, उपाध्यापिका शबाना शेख, वृषाली खांदवे, अमृता रसाळ यांच्यासह शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

वरखेडचे सुपुत्र इंजि. सचिन तायडे यांचा ‘उत्कृष्ट अभियंता पुरस्काराने’ गौरव

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंता गौरव !

जन सम्राट टाईम्स

मलकापूर । प्रतिनिधी: महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने आयोजित ‘अभियंता गौरव समारंभ-२०२६’ मुंबईतील यशवंतराव चव्हाण सभागृहात मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी उत्साहात पार पडला. सार्वजनिक बांधकाम विभागातील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत राज्यभरातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा या सोहळ्यात गौरव करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यात मलकापूर तालुक्यातील वरखेड येथील सुपुत्र तथा सहाय्यक अभियंता श्रेणी-१ इंजि. सचिन निवृत्ती तायडे यांना सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या हस्ते ‘उत्कृष्ट अभियंता पुरस्कार’ प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी त्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार सन २०२५-२६ या कालावधीत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. त्यामध्ये इंजि. सचिन तायडे यांचा समावेश आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती या सोहळ्यास सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सचिव (रस्ते) शरद ना. राजभोज, सचिव गिरीश जोशी, सहव्यवस्थापकीय संचालक राजेश भ. पाटील, सहव्यवस्थापकीय संचालक राजेंद्र पा. निगोट, सचिव राष्ट्रीय महामार्ग विभाग संतोष शेलार, सचिव प्रधानमंत्री/मुख्यमंत्री ग्राम सडक योजना प्रशांत औटी, अधीक्षक अभियंता सुनील थोटांगे, कार्यकारी अभियंता एकनाथ तळेले, जितेंद्र काळे, उपअभियंता प्रवीण पुंडकर आदी मान्यवर उपस्थित होते.



तांत्रिक कामासोबत नागरिकांशी थेट संवाद इंजि. सचिन तायडे हे अभियांत्रिकी क्षेत्रातील तांत्रिक जबाबदाऱ्या सांभाळतानाच नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर मार्ग काढण्यासाठी प्रयत्नशील अधिकारी म्हणून परिचित असल्याचे त्यांच्या सहकाऱ्यांकडून सांगण्यात येते. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी व नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या शेतरस्त्यांच्या कामांना प्राधान्य देत नियोजन, तांत्रिक निकष आणि कामाचा दर्जा यांचा समन्वय साधण्यावर त्यांनी भर दिल्याचे नमूद करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या गरजा जाणून घेणे आणि उपलब्ध प्रशासकीय यंत्रणेच्या माध्यमातून विकासकामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणे, ही त्यांच्या कार्यशैलीची वैशिष्ट्ये असल्याचे सांगण्यात येते.

धडगाव येथे मुख्याध्यापक सहविचार सभा उत्साहात संपन्न

जन सम्राट टाईम्स

धडगाव। (प्रतिनिधी): स्थानिक अश्वत्थामा माध्यमिक विद्यालय, धडगाव येथे मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी मुख्याध्यापक सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले. गटशिक्षणाधिकारी श्री. बागले यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या सहविचार सभेस प्रमुख उपस्थिती म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती दीपिका बारी तसेच केंद्रप्रमुख नितीन काळे उपस्थित होते. विद्यालयाच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. शैक्षणिक गुणवत्तावाढीवर मार्गदर्शन अध्यक्षीय मार्गदर्शन करताना गटशिक्षणाधिकारी श्री. बागले यांनी उपस्थित मुख्याध्यापकांशी विविध शैक्षणिक विषयांवर सविस्तर चर्चा केली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, शैक्षणिक उपक्रम आणि शाळेच्या प्रभावी व्यवस्थापनाबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती दीपिका बारी यांनीही उपस्थित मुख्याध्यापकांशी संवाद साधत शैक्षणिक क्षेत्रातील विविध उपक्रमांबाबत विचारविनिमय केला. यावेळी मुख्याध्यापकांनीही आपल्या शाळांमधील विविध बाबी व अनुभव मांडले. सूत्रसंचालन व आभार सभेचे नेटके सूत्रसंचालन भारत शिंदे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी धडगाव तालुका मुख्याध्यापक संघाचे तालुकाध्यक्ष के. जी. पाठक यांनी उपस्थित मान्यवर, मुख्याध्यापक व शिक्षकांचे आभार मानले. या सहविचार सभेस भरत शिरसाठ, आर. सी. चव्हाण, सुभाष राहसे, पृथ्वीराज पाटील, भरत पावरा, सोनार सर, सुकलाल वळवी यांच्यासह धडगाव तालुक्यातील मुख्याध्यापक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यालय, धडगाव येथे मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी मुख्याध्यापक सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले. गटशिक्षणाधिकारी श्री. बागले यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या सहविचार सभेस प्रमुख उपस्थिती म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती दीपिका बारी तसेच केंद्रप्रमुख नितीन काळे उपस्थित होते. विद्यालयाच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. शैक्षणिक गुणवत्तावाढीवर मार्गदर्शन अध्यक्षीय मार्गदर्शन करताना गटशिक्षणाधिकारी श्री. बागले यांनी उपस्थित मुख्याध्यापकांशी विविध शैक्षणिक विषयांवर सविस्तर चर्चा केली.



पारोळ्यात रोजगार महाकुंभ संपन्न; सुशिक्षित युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

जन सम्राट टाईम्स

पारोळा । प्रतिनिधी: येथील राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय आणि जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘पंडित दीनदयाळ उपाध्याय भव्य राज्यस्तरीय रोजगार महाकुंभ-२०२६’ मंगळवार, दि. २९ सप्टेंबर रोजी उत्साहात व यशस्वीरीत्या संपन्न झाला. शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या रोजगार मेळाव्यास पारोळा तालुक्यासह परिसरातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींनी मोठ्या संख्येने उपस्थिती नोंदवली. रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून देणाऱ्या या उपक्रमाला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध कंपन्यांकडून मुलाखती राणी लक्ष्मीबाई महाविद्यालयाच्या सभागृहात सकाळी १० वाजता रोजगार महाकुंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी सहभागी उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रता, कौशल्य आणि अनुभवाच्या आधारे मुलाखती घेतल्या. या उपक्रमामुळे रोजगाराच्या शोधात असलेल्या युवक-युवतींना कंपन्यांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधण्याची तसेच उपलब्ध रोजगाराच्या संधी जाणून घेण्याची संधी मिळाली. आयोजकांचे विशेष परिश्रम रोजगार महाकुंभाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष ॲड. वसंतराव मोरे, सचिव पराग मोरे, संचालक तथा उपनगराध्यक्ष ॲड. रोहन मोरे, प्राचार्य डॉ. व्ही. आर. पाटील, सहाय्यक आयुक्त संदीप गायकवाड, समन्वयक प्रा. डॉ. के. डी. अहिरराव व डॉ. आय. एस. पाटील यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. रोजगाराच्या दिशेने महत्त्वपूर्ण व्यासपीठ राज्यस्तरीय रोजगार महाकुंभाच्या माध्यमातून पारोळा तालुक्यासह परिसरातील युवक-युवतींना रोजगाराच्या संधींसाठी एक व्यासपीठ उपलब्ध झाले.



साफसफाईच्या चौकशीसाठी गेलेल्या विस्तार अधिकाऱ्यांनाच वाट शोधावी लागली!

ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह; विविध कामांत अनियमिततेचे तक्रारदार योगेश पाटील यांचे आरोप

जन सम्राट टाईम्स

बोदवड । प्रतिनिधी: शिरसाळा ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत करण्यात आलेल्या विविध तक्रारींच्या चौकशीसाठी पंचायत समितीच्या विस्तार अधिकाऱ्यांनी गावात प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी सार्वजनिक स्वच्छतेची स्थिती पाहून अधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केल्याचे सांगण्यात आले. विशेष म्हणजे, महिला शौचालयाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य असल्याने शौचालयापर्यंत जाण्यासाठी वाट शोधावी लागत असल्याचे चित्र चौकशीदरम्यान समोर आल्याचा दावा करण्यात आला आहे. शिरसाळा येथील शासकीय निधीचा कथित गैरवापर, अपूर्ण अथवा निकृष्ट कामे, कामे न करता बिले काढणे, ग्रामसभा न घेता कागदोपत्री ग्रामसभा दाखविणे, दलित वस्तीतील कामे अन्य ठिकाणी करणे, सार्वजनिक शौचालयासाठी टाकी न बसविता तिचे बिल काढणे, दूषित पाणीपुरवठ्याकडे दुर्लक्ष करणे आदी विविध मुद्यांबाबत योगेश पाटील यांनी तक्रार केली होती. त्यानंतर गटविकास अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार चौकशी समिती नियुक्त करण्यात आली. चौकशी समितीसमोर ग्रामस्थांनी मांडल्या समस्या चौकशी समिती गावात दाखल झाल्यानंतर ग्रामस्थांनी गावातील विविध समस्यांचा पाढाच अधिकाऱ्यांसमोर वाचून दाखविल्याचे सांगण्यात आले. मागासवर्गीय वस्तीमध्ये करण्यात आलेल्या कामांबाबतही नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. काही कामांचा दर्जा निकृष्ट असल्याचे तसेच प्रत्यक्ष काम आणि कागदोपत्री नोंदी यामध्ये तफावत असल्याचा दावा ग्रामस्थांनी चौकशी समितीसमोर केल्याचे सांगण्यात आले. तक्रारीमध्ये जिल्हा परिषद शाळेतील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सार्वजनिक आरोग्याशी संबंधित कामे, रोजगार हमी योजनेतील कामांमध्ये मास्टर व प्रत्यक्ष मागणीतील तफावत, तसेच आर्थिक नुकसान झाल्याचे आरोप करण्यात आले आहेत. शौचालय परिसरातील अस्वच्छतेवर अधिकाऱ्यांची नाराजी चौकशीदरम्यान महिला शौचालयाच्या समोरील परिसरात अस्वच्छता आढळल्याचे सांगण्यात आले. घाण व कचऱ्यामुळे शौचालयात जाण्यासाठी नागरिकांना अडचण होत असल्याचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले. या परिस्थितीवर संबंधित अधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त करून ग्रामसेवकांना ग्रामस्थांसमक्ष आठ दिवसांत साफसफाई करण्याच्या सूचना दिल्याचे सांगण्यात आले. यावेळी उपस्थित नागरिकांनी ग्रामपंचायतीच्या कार्यपद्धतीबाबतही प्रश्न उपस्थित केल्याचे समोर आले आहे. विविध कामांबाबत आर्थिक अनियमिततेचे आरोप तक्रारदार योगेश पाटील यांच्या म्हणण्यानुसार, ग्रामपंचायतीच्या विविध विकासकामांमध्ये प्रत्यक्ष काम, कामाचा दर्जा आणि काढण्यात आलेली बिले यामध्ये तफावत असल्याचे आरोप करण्यात आले आहेत. कामे न करता अथवा अपूर्ण कामांवर बिले काढल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. दलित वस्तीतील मंजूर कामे संबंधित वस्तीत न करता अन्यत्र केल्याचा, सार्वजनिक शौचालयाच्या टाकीचे काम न करता त्याचे बिल काढल्याचा तसेच गावात दूषित पाणीपुरवठा होत असतानाही त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.



श्री पंचमुखी हनुमान मंदिराच्या बांधकामासाठी साहित्याची गरज

जन सम्राट टाईम्स

साकेगाव | प्रतिनिधी: साकेगाव येथे श्री पंचमुखी हनुमान मंदिराचे भव्य बांधकाम सुरू असून, मंदिराचे बांधकाम वेळेत पूर्ण करण्यासाठी विविध बांधकाम साहित्याची आवश्यकता आहे. या पार्श्वभूमीवर भाविक, नागरिक तसेच दानशूर व्यक्तींनी साहित्य किंवा देणगीच्या स्वरूपात सढळ हाताने सहकार्य करावे, असे आवाहन मंदिर बांधकामाशी संबंधित कार्यकर्त्यांकडून करण्यात आले आहे.

मंदिराच्या बांधकामासाठी सध्या पुढील साहित्याची आवश्यकता असल्याचे सांगण्यात आले आहे— ८ एमएम लोखंडी सळई — ४ बंडल १० एमएम लोखंडी सळई — २ बंडल १२ एमएम लोखंडी सळई — ८ बंडल १६ एमएम लोखंडी सळई — ५ बंडल बांधकामाची तार — २० किलो खिळे — २० किलो सिमेंट — २०० गोण्या वीट — १० हजार नग छोटे योगदानही ठरणार मोलाचे श्री पंचमुखी हनुमान मंदिराचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण व्हावे, यासाठी नागरिकांनी आपल्या क्षमतेनुसार सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

इच्छुक भाविकांनी थेट बांधकामासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यासोबतच देणगीच्या माध्यमातूनही योगदान देता येणार आहे.

“आपले छोटेसे योगदानदेखील मंदिर उभारणीच्या या धार्मिक कार्यात मोलाची भर घालू शकते,” असे आवाहन करण्यात आले आहे. मंदिर बांधकामासाठी मदत करू इच्छिणाऱ्या भाविकांनी अधिक माहितीसाठी +९१ ८००७७ ३१२५२ या क्रमांकावर संपर्क साधावा.